
ISSN: 2249-894X Impact Factor : 5.7631(UIF)
Volume - 8 | Issue - 7 | April - 2019

REVIEW OF RESEARCH

International Online Multidisciplinary Journal

UGC APPROVED
Journal No.: 48514

# संत तुकाराम आणि संत रामदास यांच्या विचारविश्वातील परस्पर पूरकता





प्रा.प्रशांत चौधरी

प्रा.प्रशांत चौधरी

व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद.

प्रस्तावना : मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला दिशा देणारे दोन संतश्रेष्ठ म्हणजे श्री तुकाराम व श्री रामदास होत. इ.स.13 व्या शकतकात श्री ज्ञानदेवांनी ज्या भागवत धर्माचे बीज रोवले त्या भागवत धर्माचे ..........

Editor - In - Chief - Ashok Yakkaldevi




ISSN NO:- 2249-894X    Impact Factor : 5.7631(UIF)    Vol.- 8, Issue -7, April -2019

## Content


| Sr. No. | Title and Name of The Author (S) | Page No. |
|---|---|---|
| 1 | Spatio-Temporal Analysis Of Land Use/Land Cover In Honnavar Taluka, Uttara Kannada District: Using Remote Sensing Techniques<br>Dr. Basavaraj R. Bagade | 1 |
| 2 | A Study On Self Regulated Learning In Rural Schools Of Hyderabad Karnataka Region<br>Amarnath Reddy | 14 |
| 3 | संत तुकाराम आणि संत रामदास यांच्या विचारविश्वातील परस्पर पूरकता<br>प्रा.प्रशांत चौधरी | 19 |
| 4 | Performance of Poverty Alleviation Programmes: with Special Reference to Anna Bhagya Yojana At Karnataka State<br>Rajeeyabegam A. Tegginamani and Prof. D. M. Madari | 23 |
| 5 | Impact of Sanitation Programme & Hygiene Index<br>Nishant Maruti Kamble | 31 |
| 6 | Grammaticalization of Body Part Terms in Bodo<br>Araiswrang Basumatary | 49 |
| 7 | 20th Century Renowned Novelists And Their Chosen Themes – An Exploration<br>Dr. Joghee Senthilkumar | 57 |
| 8 | A Study on Performance of Microfinance in India<br>Priyanka Goyal , Sidharthi Sharma , Sneha Bhatia and Radhika | 68 |
| 9 | A Goal Programming Approach to Solve General Multilevel Programming Problems<br>Shifali Bhargava | 76 |
| 10 | Sexism in Marvel Comic Books<br>Dwitun Basumatary | 82 |
| 11 | Are Attitudes and Perceptions A Threat to Wildlife Conservation in The Ranthambhore National Park, Sawaimadhopur, Rajasthan?<br>Lima Rosalind and Affiullah Khan | 86 |

REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# संत तुकाराम आणि संत रामदास यांच्या विचारविश्वातील परस्पर पूरकता




प्रा.प्रशांत चौधरी
व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद.

मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला दिशा देणारे दोन संतश्रेष्ठ म्हणजे श्री तुकाराम व श्री रामदास होत. इ.स.१३ व्या शकतकात श्री ज्ञानदेवांनी ज्या भागवत धर्माचे बीज रोवले त्या भागवत धर्माचे शिरोमणी श्री तुकाराम ठरले. श्री ज्ञानदेव ते श्री तुकाराम ही साधारणत: पाच शतकांची परंपरा वारकरी पंथाशी निगडीत आहे. श्री तुकारामांशी समकालीन असणारे श्री रामदास हे या काळातील दुसरे थोर संत त्यांनी समर्थ संप्रदायाची केवळ स्थापनाच केली नाही तर त्याची सर्वार्थाने उभारणीही केली.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला नवी दिशा व नवा दृष्टीकोन देणाऱ्या या दोन संतश्रेष्ठांच्या विचारविश्वामधील आणि त्यांच्या व्यक्तिमत्वामधील साधर्म्य शोधण्याचा प्रयत्न या निबंधाच्या द्वारे करावयाचा आहे. संतांना अथवा महापुरूषांना जाती—पंथाच्या चौकटींमध्ये बंदीस्त करून त्यांचे कार्य व व्यक्तित्व खुजे करण्याचा प्रयत्न अनेकांकडून होताना दिसून येतो. या पार्श्वभूमीवर श्री तुकाराम व श्री रामदास या संतद्वयांच्या कार्यातील व त्यांच्या व्यक्तिमत्वातील साधर्म्य अभ्यासणे महत्वाचे वाटते.

श्री तुकाराम व श्री रामदास हे मध्ययुगीन काळातील महत्वाचे संत होऊन गेले. तत्कालीन समाजजीवन हे इस्लामी आक्रमणांनी ग्रस्त झालेले असल्याने त्यांना या संकटांशी झुंज देण्यासाठी मानसिक बळ देण्याचे कार्य या दोन्ही संतांनी अगदी यथोचित पार पाडले. त्यांचे हे कार्य परस्पर पूरक असल्याचे सिध्द करणे हा या शोधनिबंधाचा प्रमुख हेतू आहे. तसेच या संतद्वयींच्या कार्यातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक एकात्मतेचे दर्शन व्हावे, असा मानस आहे. परंतु या दोन्ही संतांना विशिष्ठ ज्ञाती वर्गाशी जोडून त्यांच्या कार्याची उंची खुजी करण्याचा प्रयत्न काही जणांनी केला आहे. या विचारांचे खंडन मला करायचे आहे आणि पुन्हा एकदा या दोन परस्पर पूरक विचारप्रवाहांच्या साम्यस्थळांचा वेध घेऊन भविष्यात महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा अधिक निकोप, एकात्म आणि एकजीनसी रहावी असा माझा प्रयत्न आहे.

मध्ययुगीन कालखंडामध्ये अनेक संप्रदाय समाजप्रबोधनाचे कार्य करीत होते. त्यात नाथ संप्रदाय, महानुभाव संप्रदाय, दत्त संप्रदाय, समर्थ संप्रदाय, विरशैव संप्रदाय, नागेश संप्रदाय, सुफी संप्रदाय, सकलमत संप्रदाय, अशा अनेक संप्रदायांचे मोठे योगदान होते. तसे पाहता सर्वच संप्रदायांचे कार्य हे परस्परपूरकच आहे. या सर्व संप्रदायांत प्रदीर्घ असा कार्यकाल हा वारकरी संप्रदायाचा आणि त्या खालोखाल समर्थ संप्रदायाचा आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

शिवराज्यकालात श्री तुकारामांनी वारकरी संप्रदायाचे कार्य हे सर्वोच्च टोकाला पोहोचवले होते. याच कालखंडात समर्थ संप्रदायाची स्थापना करून श्री रामदासांनी जागोजागी मठस्थापना करून बलोपासना सुरू केली.

श्री तुकारामांच्या प्रारंभीच्या काळात सामाजिक व राजकीय स्थिती अतिशय विपरीत होती. अहमदनगरच्या निजामशहीची सूत्रे मलिक अंबर या अतिशय हुशार व धोरणी राज्यकर्त्याच्या हातात होती. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी जहांगीर बादशहाने इ.स.१६०८ मध्ये खान खनान या सरदाराला पाठवले. तुकारामांनी नंतर पुढे 'रात्रंदिनी आम्हा युध्दाचा प्रसंग' हा गाजलेला अभंग लिहिला. अभ्यासकांच्या मते

तुकारामांचे हे म्हणणे केवळ आंतरिक संघर्षाबद्दलचे नसून ते तत्कालीन युध्दलिप्त परिस्थिती... आहे. हा युध्दाचा प्रसंग कसा होता? गनिमाची टोळधाड यावी आणि गावेच्यागावे, शेतेच्य शेते ... करून जावी, कणग्या लुटून न्याव्यात, जुलूम जबरदस्ती करावी, बाया बाटवाव्यात, अशा समाजा... आपल्या वाणीतून मानसिक बळ देण्याचे कार्य श्री तुकारामांनी केले.

श्री नामदेवांनी श्री तुकारामांच्या स्वप्नात जाऊन कविता करण्याची आज्ञा दिली आणि ... कवितेला प्रारंभ झाला, असे जरी मानले जात असले तरी तुकोबांच्या मनाला समाजात मा... भ्रष्टाचार, धर्माच्या नावाखाली चाललेला अनाचार, हिंसाचार, नीतिशून्यता हे सगळे अस्वस्थ करीत ... या अवस्थेतून त्यांनी वेदप्रामाण्य, चालीरीती, कर्मकांड यांचा तीव्र उपहास केला. सामाजिक विष... कोरडे ओढले, अर्थात त्यांच्या आक्रमकतेमागेही 'बुडता हे जन न देखे डोळा। येतो कळवळा म्हणउ... अशी व्यापक करूणामय जाणीव होती. याच काळात श्रीरामदासांनी समर्थ संप्रदायाची स्थापना ... बलोपासना व अध्यात्म यांची सांगड घालीत समाज जागृतीचे एक अद्वितीय कार्य सुरू केले.

दक्षिणेकडे मुसलमान आणि मोगल संघर्ष सुरू असताना इ.स.१९४४ ला शिवाजी महारा... स्वराज्यस्थापनेच्या कार्याचा वेग वाढत होता. या राजकीय संघर्षामध्ये सामान्य प्रजा होरपळून निघत ... लूट–पाट, धर्मांतराची सक्ती, स्त्रियांवरील अत्याचार, दुष्काळ, महागाई, ढोंगी साधू व दांभिक गुरु ... फसवेगिरी अशा गोष्टींनी व घटनांनी समाज विस्कळीत झाला होता. तीर्थयात्रेच्या दरम्यान समर्थांना ... समाजस्थितीच्या दाहक वस्तूस्थितीचे वर्णन त्यांच्या 'आस्मानी–सुलतानी' आणि 'परचक्र निरूपण' या ... प्रकरणात आलेले आहे.

समर्थांच्या मठ–महंतपध्दतीबद्दल अनेकांनी आपले मते मांडली आहेत. 'मठ महंत पध्दती... समर्थ संप्रदायाचे एक वैशिष्ट्य म्हणून सांगितले जाते. समर्थांना महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही अ... विद्येची व विचार जागृतीची केंद्रे निर्माण करावयाची होती. प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय 'मुख्य हरिकथा निरूपण। दुसरें ते राजकारण' या सूत्रानुसार करावयाचा होता. या उद्देशाने समर्थांनी महा... तसेच महाराष्ट्राबाहेरही मठांची व हनुमान मंदिरांची स्थापना करून आपले कार्य सुरू ठेवले व वृध्दिंग...

इथपर्यंत आपण या दोन्ही संतांच्या उदयकालातील समाजस्थिती पाहिली. आता त्यांच्या कार्या... समान दुव्यांच्या आधारे उभयतांतील परस्परपूरकतेचा आपणास अभ्यास करावयाचा आहे. या संत... मुख्य उद्देश समाजाचे प्रबोधन आणि सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने मानसिक व शारीरिक सबल... करणे हा होता. अनेकांनी समर्थ संप्रदाय व वारकरी संप्रदाय परस्पर विरोधी मानले असले तरी ही ... असत्य असल्याचे अनेक पुरावे आपणला इतिहासात सापडतात. र.रा. गोसावी यांनी आपल्या 'पाच ... संप्रदाय' या ग्रंथात म्हणतात, 'समर्थ रामदासस्वामींनी, ज्ञानदेवादी संत ज्या भागवत परंपरेत नांदले ... भागवतोत्तम ठरले. त्याच भागवत धर्माचा खळाळून वाहणरा स्वतंत्र प्रवाह 'स्वरूपसंप्रदाया'च्या ... प्रवर्तित केला.'[२] या नुसार आपणास असे म्हणता येईल की, समर्थ संप्रदाय आणि वारकरी संप्रदा... एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. समर्थसंप्रदायाचे मूळ हे वारकरी संप्रदायातच रूजले आहे... त्यांची आराध्ये व उपासना पध्दतीत अंतर आहे. समर्थांच्या तत्त्वज्ञानाचे वेगळेपण सांगताना मुकुंद... म्हणतात, 'समर्थांची तत्त्वदृष्टी कमालीची 'परब्रह्म'वादी आहे. ईश्वर, परमेश्वर आणि अवतार यां... मायोपहित मानतात'[३]

श्री तुकारामांचे तत्त्वज्ञान हे विठ्ठलभक्तीच्या आणि कीर्तन प्रवचनांच्या माध्यमातून ... शक्तीचे दर्शन सामान्यजनांना घडवण्यावर भर देतो, असे आपण म्हणू शकतो.

आपल्या साहित्यरचनेतून दोन्ही संतांनी समान विचार मांडलेले आपल्याला अनेक र... जाणवते. अभ्यासंती आपल्या असेही लक्षात येते की, श्री तुकारामांचे 'पाईकी' चे अभंग व श्री ... 'क्षात्रधर्माचे प्रकरण' यांत लक्षवेधी साम्य आहे.

श्री रामदास आपल्या 'क्षात्रधर्म' प्रकरणात म्हणतात,

'मरण हाक तो चुकेना। देह वाचवतां वाचवेना।
विवेकी हो समजेना। काय करावें।'

आणि श्री तुकाराम आपल्या 'पाईकी' च्या अ...

'तुका म्हणे मरण आहे या सकळ।
येणे अवकळा, अभये गोल।।'

श्री समर्थ श्लोकातून तळमळीने सांगतात,

'मना, सर्वथा नीति सोडू नकोहो। मना अंतरी सार विचार राहो।।'

तर तुकाराम म्हणतात,

'तुका म्हणे मना पाहिजे अंकुश। नित्य नवा दिस। जागृतीचा।।'

श्री रामदास स्वत:च्या मनाला उपदेश करता करता इतरांच्याही मनाला स्पर्शून जातात, तर श्री तुकारमा हे आपल्या मधून शब्दसामर्थ्याने श्रोतृवृंदांच्या मनातच हा बोध निर्माण करतात, असे म्हणता येईल. सुख–दु:खाची तुलना करीत असताना श्री समर्थ म्हणतात, 'जगी सर्व सुखी असा कोण आहे, विचार मना तुच शोधोनी पाहे।' आणि हाच विचार मांडताना श्री तुकाराम म्हणतात, 'सुख पाहता जवापाडे। दु:ख पर्वता एवढे।' तसेच श्री तुकाराम म्हणतात, 'अधिकार तैसा करू उपदेश।' तर श्री समर्थ म्हणतात आता असोहे बोलणे। अधिकारा सारिखे घेणे'

हे दोन्ही संत विवके आणि वैराग्याला नितान्त महत्व देतात. श्री समर्थांनी कुटुंबाचा त्याग करून आयुष्यभर ब्रह्मचर्य स्वीकारून वैराग्य पाळले आणि बलोपासनेच्या विचारतत्त्वावर समाजजागृती केली. श्री तुकारामांनी संसार सांभाळीत वैराग्य कसे अंगीकारावे आणि वैराग्याला अध्यात्माची व भक्तीची जोड देऊन समाजजागृती कशी करावी, याचे उत्तम आदर्श समाजापुढे ठेवले. विवके आणि वैराग्याची व्याख्या देताना दातार आपल्या 'वारकरी विश्व आणि समर्थ रामदास' या ग्रंथात म्हणतात, 'एका ईश्वराखेरीज सारे अनित्य आहे, नश्व आहे आणि म्हणून ते आपले नाही, अशा बुध्दीच्या निश्चयाला विवके म्हणतात, तर वैराग्य म्हणजे जे आपले नाही ते शरीराने आणि विशेषकरून मनाने, निग्रहपूर्वक बाजूला सारणे आणि पुढे जाऊन संपूर्णपणे सोडून देणे याला वैराग्य म्हणतात.'[४] या विवेक व वैराग्याचा विचार मांडताना श्री तुकाराम म्हणतात, 'विवेका सहित वैराग्याचे बळ।' तर श्री रामदास म्हणतात, 'विवेक आणि वैराग्य। तोचि जाणिजे महद्भाग्य।।' नवविधा भक्तिचे महत्व सांगताना श्री तुकाराम म्हणतात, 'भक्ति नवविधा। भव शुध्द बरी।' तर श्री समर्थ म्हणतात, 'नवविधा भक्ती। हा देह चालता। करावी सर्वथा। सर्व भावे।।'

श्री समर्थ व श्री तुकाराम यांच्यातील समानता दाखवण्यासाठी दातार आपल्या 'वारकरी विश्व आणि समर्थ रामदास' या ग्रंथात प्रा.त्र्यं.वि.सरदेशमुख यांचे पुढील मत अधिक स्पष्ट करून मांडतात, 'श्री तुकारम आणि श्री रामदास या समांतर रेषा नाहीत, तर एकाच रेषेचे ते दीर्घीकरण आहे. उभयतात एक राम आहे. पहिलीच्या अखेरीचा तर दुसरीच्या आरंभाचा तो बिंदू आहे. आणि हे साम्य आणि हा भेद या दोन महापुरूषांच्या जीवनाला एकाचवेळी समान अर्थ व भिन्न अर्थ देतो.'[५]

'संतांचे सुख झालेया देवा। म्हणवूनी सेवा करी त्यांची' असा संतमहिमा श्री तुकाराम गातात, तर श्री रामदास म्हणतात, 'आनंदाचे स्थळ। संत सुखचि केवळ।। नाना संतोषाचे मूळ। ते हे संत'

एक धारा, एक विचार आणि एकाच प्रवाहात वाहत असताना या संतद्वयींची भेट झाली असल्याचे नाकारणे म्हणजे अविवेकी ठरेल, हे नक्कीच. 'संत तुकाराम' या कृष्णराव केळूसकरांनी रचलेल्या चरित्रात, 'तुकाराम, शिवाजी आणि रामदास' या प्रकरणात अनेक बखरी व अनेक जुन्या पत्रांच्या आधारे श्री समर्थ, श्री तुकाराम व श्री छत्रपती शिवाजी महारजा यांच्या एकत्रीत कीर्तनाचा प्रसंग उभा करतात. या प्रसंगी श्री रामदासांवर पडलेला श्री तुकारामांचा प्रभाव केळूसकरांच्या लेखनातून स्पष्ट जाणवतो. कीर्तनाचा मोबदला म्हणजे श्रोतृवृंदाने भक्तीत तल्लीन होऊन जाणे, ही एकच गोष्ट उभय संत आपल्या रचनेतून स्पष्ट करतात. श्री तुकाराम म्हणतात, 'जेथे कीर्तन करावे तेथे अन्न न सेवावे।।' तर श्री समर्थ म्हणतात, 'द्रव्यासाठी हिंडो नये। कीर्तन करीत।।'

आजचा समाज हा पैशांच्या मागे धावणारा समाज आहे. देवपूजा असो वा देवभक्तिचे कीर्तन पैसा मोजला तरच हे घडते, अन्यथा नाही! कीर्तन असो वा देवपूजा असो याचे कोणासही पैशाइतके मोल राहिलेले नाही. आपण ज्या संतांची पूजा करतोय त्याच संतांचे कार्य पुढे चालवण्यासाठी शुल्क आकारणी करतो. म्हणजे जेवढा मोठा पंडित तेवढी मोठी दक्षिणा आणि जेवढा मोठा कीर्तनकार तेवढे मोठे त्याचे

मानधन असे म्हणावयासही हरकत नाही. ही रूढी स्थापीत झाल्याने आणि समोरच्यापेक्षा मी ... धारणेने समाजातील लोकांच्या धारणा बदलत गेल्या.

प्रस्तुत शोधनिबंधात मी श्री समर्थ आणि श्री तुकाराम यांच्या विचारविश्वातील परस्पर ... चर्चा केली आहे. या संतद्वयींच्या उदयापासून ते त्यांच्या समान कार्यकालापर्यंतचा एक धावता आ... शोधनिबंधात घेण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न केला. 'समाजहित, समाजजागृती आणि समाजसक्षमी... एकच सूत्र दोन्ही संतांच्या चरित्रांमधून मला जाणवले.

या शोधप्रबंधातून पुढील महत्वाचे निष्कर्ष उल्लेखिता येतील.

१) 'समाजजागृती आणि समाजसक्षमीकरणाच्या माध्यमातून समाज हीत' हेच सूत्र या संतद्वयींचे आ...

२) संतपरंपरेतील एकसूत्रता तत्कालीन समाजमनातील एकात्मतेचे दर्शन घडवते.

३) परकीय आक्रमणांपासून समाजाचे व संस्कृतीचे संरक्षण करण्यात राजसत्तेइतकाच संतपरंपरेचा वाटा आहे.

४) व्यक्तित्वाची जडण घडण उत्कृष्टपणे करण्याची ताकद संतसाहित्यात सर्वाधिक आहे.

संदर्भ सूची :–


१) 'तुका' 'राम' 'दास', प्रथमावृत्ती, २०१७ पृ.१०

२) गोसावी र.रा., 'पाच भक्ती संप्रदाय', तृतीय आवृत्ती, १५ ऑगस्ट २००८, पुणे, प्रतिमा प्रकाशन, २८५

३) दातार मुकुंद, 'वारकरी–विश्व आणि समर्थ रामदास', प्रथमावृत्ती, २१ मे २०११, पुणे, ... प्रकाशन, पृ.३२

४) तत्रैव

५) तत्रैव